172

• स्थापना वर्ष १९८४ • ISSN No. 2250-3846 • अंक पहिला • एप्रिल-मे-जुन २०१९

मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे मासिक मुखपत्र

# ग्रंथपरिवार

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

# सार्वजनिक ग्रंथालयाच्या सार्वजनिक सेवा

प्रा. रामेश्वर पवार
ग्रंथपाल
श्री गुरूबुद्धी स्वामी महाविद्यालय, पूर्णा (ज.) जि. परभणी

भारतात ६० हजाराच्या वर सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत असून महाराष्ट्र राज्यात ११९९३ ग्रंथालये शासन मान्य आहेत त्यावर ६० कोटीपेक्षा जास्त खर्च होतो. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकत्याच्या विविध मागण्यांसाठी राज्याचा व प्रतिष्ठानचा समान हिस्सा धरून पाच कोटीची आर्थिक तरतूद आहे. १९४९ मध्ये इफ्ला/युनेस्को सार्वजनिक ग्रंथालयाच्या तिसऱ्या प्रकाशित आवृत्तीमध्ये सांगितल्यानुसार सार्वजनिक ग्रंथालय सेवेविषयीची मुलभूत तत्वे विषद करणारा तो महत्वाचा जाहीरनामा आहे.

**व्याख्या :** सार्वजनिक ग्रंथालये सर्व जगामध्ये अस्तित्वात आहेत ती अनेक समाजगटामध्ये विविध सांस्कृतिक गटामध्ये आणि मानवी समाजाच्या विकासातील विविध टप्प्यांमध्ये स्थापन झाली आहेत.

सार्वजनिक ग्रंथालये ही विशिष्ट समाजाने अथवा स्थानिक प्रादेशिक किंवा राष्ट्रीय शासनाने अथवा समाजातील संघटनेने स्थापन केलेली आधार दिलेली आणि वित्तिय तरतूद केलेली संस्था आहे.

सार्वजनिक ग्रंथालये, ज्ञान, माहिती, कल्पनारम्य ग्रंथ आणि ज्ञान साहित्य यांच्या सहाय्याने (वंश, वय, लिंग, धर्म, भाषा, अंपगत्व, आर्थिक आणि नोकरी बाबतची परिस्थिती आणि शिक्षण इ. विषयी भेद न करता) अनेक ग्रंथालय सेवा समाजातील सर्व लोकांना उपलब्ध करुन देतात.

**हेतु :** सार्वजनिक ग्रंथालयाचा हेतु समाजातील व्यक्ती आणि गट यांना शिक्षण देणे माहिती मिळविणे आणि त्यांचा व्यक्तीमत्व विकास करणे या विषयी त्यांच्या गरजा विविध ज्ञानसाधनेद्वारे सेवा पुरवून भागविणे हा सार्वजनिक ग्रंथालयाचा प्रधान हेतु आहे.

सध्या जगामध्ये अनेक ज्ञानाची माध्यमे जसे दूरदर्शन, सिनेमा, दृकश्राव्य साधने इंटरनेट इ. विकसित झाली आहेत. त्यांच्या विषयी ही ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणे हा ही हेतु आहे.

लोकशाही समाजाचा विकास आणि प्रसार करण्यासाठी या ग्रंथालयांना महत्वाचे कार्य करावयाचे आहे. त्यासाठी त्यांना ज्ञान, कल्पना आणि मते प्रकाशित करणारी ज्ञानसाधने उपलब्ध करुन द्यावयास हवीत.

शिक्षण

सार्वजनिक ग्रंथालयानी व्यक्तीचे शिक्षण आणि स्वंयशिक्षण घेण्यासाठी तसेच औपचारिक शिक्षण विविध स्तरावर घेण्यासाठी सहाय्य केले पाहिजे. अनेक राष्ट्रामध्ये सार्वजनिक ग्रंथालये आणि शाळेचे ग्रंथालय म्हणून एकच काम पाहते. उदा. इंग्लंडमधील ट्रॅफोर्ड विभागात तीन लहान ग्रंथालये एकत्रित येवून आपल्या सुविधा वाचकांना उपलब्ध करुन देतात. दक्षिण आफ्रिकेतील झिंबाब्वे, बुल्वामो, येथे फिरती ग्रंथालय सेवा आहे त्याद्वारे आठवड्यातून ३७ प्राथमिक शाळांना सेवा पुरविली जाते.

स्पेन मधील बार्सिलोना प्रांतामध्ये सार्वजनिक ग्रंथालये कॅटेलिनिया मधील मुक्त विद्यापीठातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सेवा पुरवितात. ऑस्ट्रेलियामधील क्विंसलॅण्ड राज्यामधील सार्वजनिक ग्रंथालयात प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना गृहपाठासाठी



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Estd. 1962

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# सार्वजनिक ग्रंथालयाच्या सार्वजनिक सेवा

प्रा. रामेश्वर पवार
ग्रंथपाल
श्री गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं.) जि. परभणी

भारतात ६० हजाराच्या वर सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत असून महाराष्ट्र राज्यात ११९९३ ग्रंथालये शासन मान्य आहेत त्यावर ६० कोटीपेक्षा जास्त खर्च होतो. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकत्याच्या विविध मागण्यांसाठी राज्याचा व प्रतिष्ठानचा समान हिस्सा धरून पाच कोटीची आर्थिक तरतूद आहे. १९४९ मध्ये इफ्ला/युनेस्को सार्वजनिक ग्रंथालयाच्या तिसऱ्या प्रकाशित आवृत्तीमध्ये सांगितल्यानुसार सार्वजनिक ग्रंथालय सेवेविषयीची मुलभूत तत्वे विषद करणारा तो महत्वाचा जाहीरनामा आहे.

**व्याख्या :** सार्वजनिक ग्रंथालये सर्व जगामध्ये अस्तित्वात आहेत ती अनेक समाजगटामध्ये विविध सांस्कृतिक गटामध्ये आणि मानवी समाजाच्या विकासातील विविध टप्प्यांमध्ये स्थापन झाली आहेत.

सार्वजनिक ग्रंथालये ही विशिष्ट समाजाने अथवा स्थानिक प्रादेशिक किंवा राष्ट्रीय शासनाने अथवा समाजातील संघटनेने स्थापन केलेली आधार दिलेली आणि वित्तिय तरतूद केलेली संस्था आहे.

सार्वजनिक ग्रंथालये, ज्ञान, माहिती, कल्पनारम्य ग्रंथ आणि ज्ञान साहित्य यांच्या सहाय्याने (वंश, वय, लिंग, धर्म, भाषा, अपंगत्व, आर्थिक आणि नोकरी बाबतची परिस्थिती आणि शिक्षण इ. विषयी भेद न करता) अनेक ग्रंथालय सेवा समाजातील सर्व लोकांना उपलब्ध करुन देतात.

**हेतु :** सार्वजनिक ग्रंथालयाचा हेतु समाजातील व्यक्ती आणि गट यांना शिक्षण देणे माहिती मिळविणे आणि त्यांचा व्यक्तीमत्व विकास करणे या विषयी त्यांच्या गरजा विविध ज्ञानसाधनेद्वारे सेवा पुरवून भागविणे हा सार्वजनिक ग्रंथालयाचा प्रधान हेतु आहे.

सध्या जगामध्ये अनेक ज्ञानाची माध्यमे जसे दूरदर्शन, सिनेमा, दृकश्राव्य साधने इंटरनेट इ. विकसित झाली आहेत. त्यांच्या विषयी ही ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणे हा ही हेतु आहे.

लोकशाही समाजाचा विकास आणि प्रसार करण्यासाठी या ग्रंथालयांना महत्वाचे कार्य करावयाचे आहे. त्यासाठी त्यांना ज्ञान, कल्पना आणि मते प्रकाशित करणारी ज्ञानसाधने उपलब्ध करुन द्यावयास हवीत.

शिक्षण

सार्वजनिक ग्रंथालयानी व्यक्तीचे शिक्षण आणि स्वंयशिक्षण घेण्यासाठी तसेच औपचारिक शिक्षण विविध स्तरावर घेण्यासाठी सहाय्य केले पाहिजे. अनेक राष्ट्रामध्ये सार्वजनिक ग्रंथालये आणि शाळेचे ग्रंथालय म्हणून एकच काम पाहते. उदा. इंग्लंडमधील ट्रॅफोर्ड विभागात तीन लहान ग्रंथालये एकत्रित येवून आपल्या सुविधा वाचकांना उपलब्ध करुन देतात. दक्षिण आफ्रिकेतील झिंबाब्वे, बुल्वामो, येथे फिरती ग्रंथालय सेवा आहे त्याद्वारे आठवड्यातून ३७ प्राथमिक शाळांना सेवा पुरविली जाते.

स्पेन मधील बार्सिलोना प्रांतामध्ये सार्वजनिक ग्रंथालये कॅटेलिनिया मधील मुक्त विद्यापीठातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सेवा पुरवितात. ऑस्ट्रेलियामधील क्विसलॅण्ड राज्यामधील सार्वजनिक ग्रंथालयात प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना गृहपाठासाठी



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

इलेक्ट्रॉनिक्सची माध्यमेही वापरावयास दिली जातात.

सार्वजनिक ग्रंथालय हे स्थानिक स्तरावर माहिती देणारे केंद्र आहे. ते आपल्या वाचकांना सर्व प्रकारचे ज्ञान आणि माहिती तत्परतेने उपलब्ध करुन देते. माहितीचा संग्रह करणे आणि ती वाचकांना उपलब्ध करुन देणे या कार्यामध्ये इतर ग्रंथालयांशी आणि माहिती केंद्रांशी सहकार्यही सार्वजनिक ग्रंथालये करतात.

जगामध्ये उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये सातत्याने मोठ्या प्रमाणात भर पडत आहे. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानामध्ये सतत बदल होत आहे. यामुळे माहिती उपलब्ध करुन घेण्याच्या पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. ग्रंथालयाद्वारा देण्यात येणाऱ्या सेवा यामध्ये लक्षणीय परिणाम झाला आहे. समाजाच्या विकासात माहितीला फार महत्व आहे. आजच्या वाचकांना ग्रंथालयांनी इंटरनेटद्वारा माहिती उपलब्ध करुन द्यावयास हवी त्याचप्रमाणे पुर्वापार चालत आलेल्या मुद्रित ग्रंथ, नियतकालिके या स्वरुपातील ज्ञानही उपलब्ध करुन द्यावयास हवे. मलेशियामधील सबाह स्टेट लायब्ररीने आपल्या अखत्यारितील ग्रंथालयामध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे कॉर्नर्स ही सुविधा निर्माण केली आहे.

महाराष्ट्रातून मुंबई, कोकण, जालना, नांदेड येथे अद्ययावत संगणक लॅबसह इंटरनेट सेवा शासन स्तरावर सुरु केल्या आहेत.

**व्यक्तीमत्व विकास :** मानवाच्या विकासासाठी व्यक्तीची सर्जनशिलता विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणे नविन विषयाचा अभ्यास चालू ठेवणे हे व्यक्तीच्या विकासासाठी महत्वाचे आहे. वाचकांना श्राव्य, दृक-श्राव्य, सीडी उपलब्ध करुन देणे. मनोरंजनासाठी प्रतिभा संपन्न ग्रंथ आणि नवनवीन ज्ञान वाचकांना उपलब्ध करुन देणे हे सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान आहे.

**बालक वाचक :** सार्वजनिक ग्रंथालयात 'अ' आणि 'ब' दर्जाच्या ग्रंथालयात बालविभाग स्वतंत्र असला पाहिजे, राजा राममोहन रॉय, ग्रंथालय प्रतिष्ठान बालविभाग समृध्दी योजना अंतर्गत व बालविभाग कॉर्नरसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक साहय दृकश्राव्य साधने, सीडी, संगणक, लहान मुलांचे विश्वकोष, ग्रंथ खरेदीसाठी तसेच बालविभाग अद्ययावत समृध्द करणे, खेळीस रंगरंगोटीसाठी अर्थसाह्य देणे. सार्वजनिक ग्रंथालयांनी वय, शारिरीक, आर्थिक किंवा सामाजिक परिस्थिती या विषयी भेद न करता समाजापर्यंत सर्व गटांच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यात कथाकथन, दृकश्राव्य साहित्य, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातील साहित्य, संगणक खेळ, लोकप्रिय व राष्ट्रीय व्यक्तीमत्व, साहस कथा, कादंबऱ्या, कल्पनारम्य आणि अद्भुत कथांच्या वाचनाने स्फूर्ती देणारे वाचन साहित्य बाल वाचकांना दिले पाहिजे. सार्वजनिक ग्रंथालये आणि सांस्कृतिक विकास महाराष्ट्रात 'अ' दर्जाच्या ग्रंथालयांनी वार्षिक किमान १० व 'ब' दर्जाच्या ग्रंथालयांनी किमान चार सांस्कृतिक कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. यात वक्तृत्वस्पर्धा, व्यक्तीमत्व विकास, व्याख्याने, राष्ट्रीय नेत्यांच्या कार्याचा गौरव, शाळेतील वाचकांसाठी निबंध स्पर्धा इ. कार्यक्रमाचे आयोजन करणे आवश्यक आहे. सार्वजनिक ग्रंथालयांनी सांस्कृतिक आणि कलात्मक विकास साधण्यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. याशिवाय समाजाची सांस्कृतिक ओळख पटविण्याच्या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे.

**स्थानिक गरजा व संस्कृती :** स्थानिक रहिवाशांच्या गरजेनुसार त्यांनी ग्रंथसंग्रह करावयास हवा तसेच ग्रंथालय सेवा पुरविल्या पाहिजेत. वाचकांच्या वाचनाभिरुची मध्ये बदल होत आहेत याचा अभ्यास करायला हवा. समाजामध्ये सामाजिक आर्थिक विकास, वयोमानानुसार वर्गवारी, शिक्षणाची पातळी, रोजगाराच्या उपलब्ध होणाऱ्या संधी, सांस्कृतिक सुविधा पुरविण्याऱ्या बदलाची जाण ग्रंथालयास हवी.



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Estd. 1960
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

स्थानिक इतिहास विषयक ज्ञानसाधने प्रदर्शन भरविण्यात, कथाकथनाचे कार्यक्रमाचे आयोजन करणे, स्थानिक स्वरुपाची माहिती जसे, मंदिर, प्रेक्षणिय स्थळे, संस्था, उपक्रम प्रसिध्दी, स्थानिक महत्व, उत्सव, परंपरा असे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. थोडक्यात गावाचा संपूर्ण इतिहास ग्रंथालयात असला पाहिजे.

ग्रंथालयाची इमारत :

सार्वजनिक ग्रंथालयासाठी प्रशस्त ग्रंथालय इमारत असावी त्याचा आराखडा उत्तम रितीने झाला पाहिजे. समाजातील सर्व लोकांना ती वापरता आली पाहिजे. यात सांस्कृतिक सभागृह, वाचनकक्ष, महिला, बाल, ज्येष्ठ नागरिक, ग्रंथ संग्रह विभाग, दृकश्राव्य विभाग, कार्यालय, संस्था कार्यालय, असणे आवश्यक आहेत.

ग्रंथालयाच्या इमारतीचे नियोजन करतांना साधारणपणे ग्रंथालय समितीने सामाजिक घटकांचा विचार करावा.

ग्रंथालयाची कार्ये, ग्रंथालयाचा आकार, वाचकांना कपाटाजवळ जाण्याची सुविधा, सूचना फलक, ग्रंथालयाचे वातावरण, सौंदर्य अंतर्गत सजावट, इलेक्ट्रॉनिक आणि दृकश्राव्य साधन सामुग्री, सुरक्षा, वाहनतळ, ग्रंथालयाच्या विस्ताराचाही विचार करावयास पाहिजे.

संग्रह :

वाचकांच्या गरजेनुसार ग्रंथालयात वाचन साहित्य ग्रंथाचा संग्रह असावा. यात ललित वाङ्मय ग्रंथ, प्रौढ, युवक, बालकांसाठी ललितेत्तर ग्रंथ असावे, संदर्भ ग्रंथ, माहितीसाठे, नियतकालिके, स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय वर्तमानपत्रे, स्थानिक समाजगटाविषयी माहिती, शासकीय माहिती, स्थानिक प्रशासन, औद्योगिक माहिती, स्थानिक इतिहास, घराण्याचा इतिहास, स्थानिक ज्ञानसाहित्य, इतर भाषातील ज्ञान साहित्य, संगीत, खेळ, कोडी, शेती, स्पर्धा परीक्षा, महिलाविषयक, ज्येष्ठ नागरिकांसाठीचे वाचन साहित्य ग्रंथालयात संग्रहीत असावे.

कर्मचारी वर्ग :

सार्वजनिक ग्रंथालयाची कामे समाधानकारकरित्या पार पाडण्याकरिता त्याला आवश्यक ते ग्रंथ ग्रंथालयात असावे. ग्रंथालय सेवक, कर्मचारी वर्ग हा प्रशिक्षित संगणकाचे ज्ञान असणारा आवश्यक आहे. वाचकांना ग्रंथ, वाचन साहित्य, आधुनिक सेवा पुरवाव्या लागतात. त्यासाठी पुरेसा निधी व कर्मचाऱ्यांना समाधानकारक वेतन देणे आवश्यक आहे. सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी खालील सेवा वाचकांना दिल्या पाहिजेत.

संभवनीय वाचकांचा शोध घेणे, वाचकांच्या गरजांचे पृथ्थकरण करणे, व्यक्तीगत वाचकांसाठी ग्रंथाचे पृथ्थकरण करणे, व्यक्तीगत वाचकांसाठी आणि वाचक गटासाठी ग्रंथालय सेवा विकसित करणे, वाचकांची काळजी घेण्यासाठी धोरण आखणे, वाचकांसाठी ग्रंथालय परिचय कार्यक्रम आखणे. ज्ञान साधने, संपत्तीचे रक्षण संवर्धन जतन करणे व वाचकांपर्यंत देवघेव /आदान प्रदान करणे. इलेक्ट्रॉनिक जाळी स्थापन करणे, ग्रंथालय इमारतीचे रक्षण करणे, समाजातील सर्व स्तरातील वाचकांना ग्रंथालयीन सेवा देणे इ. शासनाने ठरवून दिलेल्या आराखड्यानुसार व ग्रंथालयाच्या दर्जानुसार कर्मचारी पद मान्य होते.

ग्रंथालय सेवेसाठी :

-ग्रंथ आणि इतर माध्यमातील वाचन साहित्याची देवघेव करणे.

-ग्रंथालयात बसून ग्रंथ आणि वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे.

-मुद्रित ग्रंथ आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातील ज्ञानसाधनांचा वापर करुन माहिती सेवा पुरविणे.

-वाचकांसाठी ग्रंथ राखून ठेवण्याची सेवा तसेच वाचक सल्ला सेवा पुरविणे.

- सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव, दिन प्रदर्शने साजरे करणे.



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.)

176



**डिजिटल ग्रंथालये :** सार्वजनिक ग्रंथालये सर्व वाचकांना समान संधी देणारी साधने आहेत. यासाठी सध्याच्या डिजीटल युगामध्ये जागतिक सर्व माहिती इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारा उपलब्ध व्हावयास पाहिजे. यासाठी इलेक्ट्रॉनिक नेटवर्कसंचा उपयोग करण्यासाठी त्यांना आर्थिक निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. या माध्यमांद्वारा जगातील सर्व ज्ञानाचे स्रोतापर्यंत वाचकांना पोहचता आले पाहिजे तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नेटवर्कसचे सभासद होवून त्यांचा फायदा करुन घ्यावयास पाहिजे. यासाठी सामाजिक नेटवर्कमध्ये भाग घ्यावयास पाहिजे. राष्ट्रीय माहिती धोरणाचा भाग म्हणून इलेक्ट्रॉनिक्स नेटवर्क कार्यक्रमाचा समावेश करावा.

**वाचकांना माहिती उपलब्धी :** इंटरनेट, वर्ल्डवाईड वेब वरील माहिती वाचकांना मोफत उपलब्ध करुन दिली पाहिजे. यासाठी ग्रंथालयात किमान एक केंद्र तरी असावे. त्याला प्रिंटर जोडलेला असावा. तो फक्त वाचकांनाच उपलब्ध असावा. त्याचे सहाय्याने माहितीची मुद्रित प्रत वाचकांना मिळू शकेल.

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1983

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

• स्थापना वर्ष १९८४ • ISSN No. 2250-3846 • अंक दुसरा • जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०११

मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे मासिक मुखपत्र

# ग्रंथपरिवार

(7)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani


178

मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे मासिक मुखपत्र

# ग्रंथपरिवार

○ संस्थापक संपादक ○

मा. वि. देशपांडे



○ पत्र व्यवहारासाठीचा पत्ता ○
जीवन विकास ग्रंथालय,
१६१, टिळक नगर, सावरकर चौक,
औरंगाबाद
फोन : ०२४० - २३२४८८१

या मासिकातील लेखांशी कार्यकारी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

(ग्रंथालय मार्गदर्शक, ग्रंथालय संचालनालय मुंबई यांच्या अनुदानातून)

## अनुक्रमणिका


१) ई-ग्रंथालय : सार्वजनिक ग्रंथालयासाठी एक पर्वणी

२) गरज वाचन संस्कृती रुजविण्याची

३) राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजना

४) भारतीय शिक्षण व्यवस्था व आजची परिस्थिती

५) ग्रंथालयाचे हेतु व उद्दिष्टे

६) आज संकल्प करू या अज्ञानावर विजय मिळवण्याचा

७) ग्रंथालयशास्त्राचे शिल्पकार डॉ.एस.आर.रंगनाथन

८) ग्रंथालय : एक ज्ञान मंदीर

९) परिवर्तन वादी साहित्य वाचन काळाची गरज

१०) शैक्षणिक व सार्वजनिक ग्रंथालयांच्या सेवा

११) माहिती साक्षरता

१२) ग्रंथालय सहकार्य : वाचन साहित्याचा सामुहिक उपयोग-नेटवर्क


वार्षिक वर्गणी : १८०/-

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

179



# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजना

डॉ. रामेश्वर सूर्यभानजी पवार
परभणी

मागील अंकावरून....

**अर्ज करण्याची पध्दत व त्या सोबतची सहपत्रे :**

केंद्र शासन पुरस्कृत बाल ग्रंथालये (उदा.जवाहरलाल बाल भवन, अरविंद बाल केंद्र,) यांना प्रतिष्ठानकडे सरळ अर्ज करता येतो. इतर ग्रंथालयांना प्रतिष्ठानने दिलेल्या विहित नमुन्यात राज्य ग्रंथालय नियोजन समिती मार्फत अर्ज सादर करावा लागतो. या अर्जासोबतची सर्व कागदपत्रे इंग्रजी किंवा हिंदी भाषेमध्ये माहिती भरलेली असली पाहिजेत. संबंधित विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालकामार्फत तीन प्रतीत पूर्ण कागदपत्रांसह अर्ज पाठवावा लागतो. या योजनेच्या अर्जासोबतची सहपत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

१) ग्रंथालयाची मेमोरंडमसह घटना व नियमावली

२) अद्ययावत पूर्ण वार्षिक अहवाल

३) अद्ययावत पूर्ण अंकेक्षण अहवाल.
(जमाखर्च, ताळेबंद, उत्पन्न व खर्च विवरण पत्रासह)

४) विश्वस्त संस्था नोंदणी प्रमाणपत्र

५) खर्चाची बाबनिहाय अंदाजपत्रक (खरेदी करावयाच्या ग्रंथाची, फर्निचरची निविदा पत्रात लांबी, रुंदी, ऊंची, जाडी, इत्यादी वर्णन स्पष्टपणे नमूद केलेले असले पाहिजे.)

६) जास्तीचा खर्च भरून काढण्यासाठी केलेली तरतूद स्पष्ट करणारा पुरावा.

७) अर्ज करण्यापूर्वी बालविभाग असल्यास त्याचे छायाचित्र

**अनुदान खर्च केल्यानंतर सादर करावयाची कागदपत्रे :**



Co-ordinator
IQAC

PRINCIPAL

ग्रंथालयाचे प्रस्ताव समितीच्या शिफारशिनंतर प्रतिष्ठानकडे मंजूरीसाठी पाठविले जातात. प्रतिष्ठानचे सहाय्य मिळण्यापूर्वी केलेला खर्च हिशोबात धरला जात नाही तसेच प्रतिष्ठानने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकात बदल करता येत नाही. प्रतिष्ठानतर्फे मंजुरी मिळाल्यानंतर नियंत्रक केंद्रीय पध्दतीने कमीत कमी तीन निविदा मागवून व त्यातील कमी किंमतीची निविदा स्वीकारुन खरेदि करु शकतो. मात्र अशी खरेदी करतांना शासन अंगीकृत यंत्रणा, शासकीय विक्रेता दर करार किंवा लघुउद्योग संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे. प्रस्ताव पाठविणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांचे वितरण शासनाच्या खर्चाने किंवा संस्थेच्या खर्चाने केले जाते. खरेदी केलेल्या ग्रंथसंग्रहण साहित्याच्या आदेशाच्या प्रती व देयके प्राप्त झाल्यानंतर प्रतिष्ठानतर्फे आवश्यक ती रक्कम अदा केली जाते. ग्रंथालयांनी प्राप्त झालेल्या प्रतिष्ठानतर्फे आवश्यक ती रक्कम अदा केली जाते. ग्रंथालयांनी प्राप्त झालेल्या ग्रंथसंग्रहण साहित्याची कायम समान नोंदवहीत नोंद करुन पोचपावती व ''राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या सहाय्यामधून खरेदी'' असे नमूद केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ग्रंथालयाला रक्कमेच्या स्वरुपात दिलेल्या अनुदानाच्या बाबतीत ग्रंथालयांनी खरेदी पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत सनदी लेखापाल यांच्या स्वाक्षरीचे जमाखर्च विवरण पत्र व उपयोगिता प्रमाणपत्र आणि खर्चाच्या देयकाची व रक्कम दिल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत व ग्रंथसंग्रहण साहित्यावर ''राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या सहाय्यामधून खरेदी'' असे नमूद केल्याबाबतचे प्रमाणपत्र नियंत्रकामार्फत प्रतिष्ठानकडे पाठवावे लागते.

**समापन:**

या योजनांशिवाय प्रतिष्ठानतर्फे वेगवेगळ्या विकासात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच गत ५-६ वर्षापासून राज्य मध्यवर्ती ग्रंथालये व जिल्हा ग्रंथालये यांना क्षेत्रिय स्तरावर पुरस्कार देवून गौरविण्यात येते. या पुरस्काराची सुरुवात झाल्यापासून प्रतिवर्षी हा पुरस्कार या क्षेत्रातील महाराष्ट्र राज्यातील शासकीय व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी मिळविला आहे, ही राज्यातील ग्रंथालय विकासाच्या चांगल्या कामाची पावती आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, २००३-२००४ पासून ग्रामीण ग्रंथालयांना पुरस्कार देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. प्रतिष्ठानतर्फे राष्ट्रीय ग्रंथालय आणि माहितीविषयक धोरणाचा मसुदा भारत सरकारला सादर करण्यात आलाआहे. प्रतिष्ठानचे कार्य राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील शासनाने दिलेल्या प्रतिसादावर व सहकार्यावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानची आर्थिक स्थिती संपन्न असल्याशिवाय सर्वयोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होणारच नाही याची प्रतिष्ठानला जाणीव आहे.

* * *



Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd. 1983

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalay